**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

---

धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची मौजे कुर्ला भाग-३, ता. कुर्ला, स.न. २२९, न.भू.क्र. २ येथील अंदाजे ८.५० हेक्टर क्षेत्राकरीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१)(बी) अन्वये अधिसूचना.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**क्रमांक :- टिपीबी-४३२३/युओआर-७/प्र.क्र.१८/२०२३/नवि-११**
**दिनांक :- २७ जुन, २०२५.**

**<u>शासन निर्णय</u>** : सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Patil

**( अमर पाटील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

(१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
(२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
(३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
(४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(५) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
(८) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

(१) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महानगरपालिका मार्ग, मुंबई-०१.
(४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
(५) ( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती १) नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई, २) मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्ससन प्राधिकरण, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ ३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व ४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(६) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
(७) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

---

Notification under Section 40(1b) of the said act for appointment of Dharavi Redevelopment Project, Slum Rehabilitation Authority as a Special Planning Authority for land admeasuring approx.8.5 hectare of CTS No. 2, S.No.229, Village Kurla Part-3, Tal. Kurla, Mumbai.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated :- 27th June, 2025.

## NOTIFICATION

**No. TPB-4323/UOR-7/CR-18/2023/UD-11**

Whereas, the Government in Urban Development Department vide Notification No. TPB-4385/40198/CR-776/85/UD-5, dated the 26th May 1987 has sanctioned a Revised Development Plan for Dharavi Area from "G" North Ward under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act. 1966. (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, the Government of Maharashtra considered that areas from 'G' North ward known as " Dharavi Area" was in undeveloped condition and need to be developed in a comprehensive manner and for this purpose, to take urgent and appropriate steps for the said development, Government of Maharashtra Urban Development Department wide Notification No. TPB-4387/1798/CR-317/87/UD-5, dated 3rd June 1987 had appointed Maharashtra Housing and Area Development Authority as the Special Planning Authority for Planning and Development of "Dharavi Area" more specifically defined in the schedule therein;

Whereas, for Dharavi Area, Government of Maharashtra by Notification Housing and Special Assistance Department, wide notification No. SRP-1095/CR-37/Housing Cell, dated 16th December 1995, has appointed "Slum Rehabilitation Authority" under provision of section 3A of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 for Slum Redevelopment;

And whereas, the Maharashtra Housing and Area Development Authority by Resolution No. 5382 of 14th December 1998, has requested the State Government to denotify Maharashtra Housing and Area Development Authority for Dharavi Area;

And whereas, the Government of Maharashtra vide Government Resolution of Housing Department No. झोपयो-२००३/प्र.क्र.१८९/झोपसु १ अ, dated 4th February 2004 had resolved to implement Dharavi Development Action Plan and to declare "Slum Rehabilitation Authority" as Special Planning Authority for the said Area;

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32. सत्यमेव जयते

And whereas, the State Government in Urban Development Department vide Notification No. TPB-4303/322/CR-56/4/UD-11. dated 9th March 2005 has appointed Slum Rehabilitation Authority as the Special Planning Authority for the planning and development of Dharavi Area namely Sector 1 to 4, more specifically defined in the Schedule therein, under sub-section (1b) of section 40 of the said Act;

And whereas, the State Government in Urban Development Department vide Notification No. TPB-4308/3499/CR-83/09/UD-11, dated 25th June 2009, has appointed Slum Rehabilitation Authority as the Special Planning Authority for the planning and development of Dharavi Area namely area of Sector 5, more specifically defined in the Schedule therein, under sub-section (1b) of section 40 of the said Act;

And whereas, the State Government in Urban Development Department vide Notification of even number dated 07/02/2023 has included the railway land adjacent to the Dharavi area more specifically mentioned in the Schedule therein in the Dharavi notified area and has appointed Slum Rehabilitation Authority as the Special Planning Authority under sub-section (1b) of section 40 of the said Act for the planning and development of the above said area;

And whereas, the Chief Executive Officer and Special Duty Officer, Dharavi Rehabilitation Project, Slum Rehabilitation Authority (hereinafter referred to as the "said Authority") in his letter dated 16/04/2025 submitted to the Government in Urban Development Department has stated that, as per the Government resolution dated 10/06/2024 of the Department of Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries, it has been decided to transfer approx. 8.50 hectare of land under the jurisdiction of the Commissioner, Dairy Development Department located at CTS No. 2, Survey No. 229, Village Kurla Part-3, Matrudugdhashala, Tal. Kurla, Mumbai (hereinafter referred to as the "said Land") to the Dharavi Redevelopment Project, Slum Rehabilitation Authority. Also, as per the memorandum dated 14/06/2024 of the Revenue and Forest Department, the said 8.50 hectare land has been given to the Dharavi Redevelopment Project on some terms and conditions. Accordingly, the City Survey Officer, Kurla has demarcated and given possession of the said 8.50 hectare of land to the Dharavi Redevelopment Project on 04/02/2025, and in view of the above the said authority has requested the Government in Urban Development Department to appoint "Dharavi Redevelopment Project, Slum Rehabilitation Authority" as the Special Planning Authority for the said land;

And whereas, considering the request of the said Authority and in view of the above stated facts, Government is of the opinion that the necessary Notification is required to be issued;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1b) of section 40 of the said Act and all powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby :-

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते मंत्रालय, मुंबई - 32.

Patil

A) Appoints "Dharavi Redevelopment Project, Slum Rehabilitation Authority" as the Special Planning Authority for the said area more specifically mentioned in the schedule here under for planning and development of the said area.

B) Fixes the date of publication of this Notification in the Official Gazette as the date of coming into force of this Notification.

## SCHEDULE

I) Approx. 5.90 hectare out of 8.50 hectare (Zone "A") of the land bearing CTS No. 2, Survey No. 229, Village Kurla Part-3, Tal. Kurla, Mumbai and its adjacent boundaries :-

| Sr. No. | Directions | Bounded by |
|---|---|---|
| 1 | North | Harbour line railway track |
| 2 | North-East | Harbour Line railway track and Boundary of Metro Line -Phase 2B |
| 3 | East | Boundary of Metro Line Phase 2B |
| 4 | South-East | Boundary of Metro Line Phase 2B |
| 5 | South | Boundary of Suprit Dagade Apartment Building No. 133 |
| 6 | South-West | Boundary of Building: Gagan 139, Ragav Marvel, Building No. 141, 142, 143, Ragav One, Ragav 45 |
| 7 | West | Boundary of Building: Gagan 139, Ragav Marvel, Building No. 141, 142, 143, Ragav One, Ragav 45 |
| 8 | North-West | Railway Plot Boundary along Harbour line railway track |

II) Approx. 2.60 hectare out of 8.50 hectare (Zone "B") of the land bearing CTS No. 2, Survey No. 229, Village Kurla Part-3, Tal. Kurla, Mumbai and its adjacent boundaries :-

| Sr. No. | Directions | Bounded by |
|---|---|---|
| 1 | North | Harbour line railway track |
| 2 | North-East | Boundary of Nalla along kamgar Nagar Road |
| 3 | East | Boundary of Nalla along kamgar Nagar Road |
| 4 | South-East | Shree Krishna Mandir and Shree Vitthal Rukmini Mandir, Kamgar Nagar road. |
| 5 | South | Boundary of Building Hareshwar Pride & Shantaram Naik Clinic & Healthcare Center |
| 6 | South-West | Lokmanya Tilak Terminus Flyover |
| 7 | West | Lokmanya Tilak Terminus Flyover |
| 8 | North-West | Lokmanya Tilak Terminus Flyover |

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई-32.

A copy of this Notification along with plan shall be made available for inspection for a period of one month at the following offices:-

1) Dharavi Redevelopment Project Slum Rehabilitation Authority, 5th floor, Grihanirman Bhavan, Bandra (E), Mumbai-51.
2) Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, ENSA Hutment, Mahapalika Marg, Mumbai.

This notification shall also made available on Govt. of Maharashtra website: www.Maharashtra.gov.in (Act/Rule).

By order and in the name of the Governor of Maharashtra.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32. सत्यमेव जयते

Patil

**(Amar Patil )**
**Under Secretary to Government**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

---

धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची मौजे कुर्ला भाग-३, ता. कुर्ला, स.न. २२९, न.भू.क्र. २ येथील अंदाजे ८.५० हेक्टर क्षेत्राकरीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१)(बी) अन्वये अधिसूचना.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- २७ जून ,२०२५**

**अधिसूचना**

**क्रमांक :- टिपीबी-४३२३/यु.ओ.आर.७/प्र.क्र.१८/२०२३/नवि-११**

ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३८५/४०१९८/प्र.क्र.७७६/८५/ नवि-५, दिनांक -२६/०५/१९८७ अन्वये जी/उत्तर प्रभागातील धारावी क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार मंजूर केला आहे;

आणि ज्याअर्थी, जी/ उत्तर प्रभागातील 'धारावी' नावाने ओळखले जाणारे क्षेत्र हे अविकसित असल्याने सदर क्षेत्राचा सर्वसमावेशक नियोजन पध्दतीने विकास करणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेऊन त्यानुसार याबाबतीत तातडीने उपाययोजना करावयाच्या हेतूने शासन नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३८७/ १७९८/प्र.क्र.३१७/ ८७/नवि-५, दिनांक १६/०६/१९८७ अन्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांची सदरहु अधिसूचनेमध्ये निर्धारीत केलेल्या धारावी क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली होती;

आणि ज्याअर्थी, शासन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने अधिसूचना क्र. एसआरपी-१०९५/प्र.क्र.३७/गृहनिर्माण कक्ष, दि. १६/१२/१९९५ अन्वये "झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण" यांची झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम १९७१ चे कलम ३अ नुसार झोपडपट्टी पुनर्विकासाठी नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण ने ठराव क्र. ५३८२, दि.१४/१२/१९९८ अन्वये धारावी क्षेत्रासाठी म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून केलेली नेमणूक रद्द करण्याबाबत शासनास विनंती केली होती;

आणि ज्याअर्थी, शासनाने गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र. झोपयो - २००३ / प्र.क्र.१८९ /झोपसु-१अ, दिनांक-०४/०२/२००४ अन्वये धारावी विकास कृती योजना राबविण्याचा तसेच धारावी क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्याचा निर्णय घेतला आहे;

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32
सत्यमेव जयते

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३०३/३२२/प्र.क्र.५६/०४/नवि-११, दिनांक ९/०३/२००५ अन्वये सदरहु अधिसूचनेच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार धारावी क्षेत्रातील सेक्टर-१ ते ४ चे नियोजन व विकास करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाची उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३०८/३४९९/प्र.क्र.८३/०९/नवि-११, दिनांक २५/०६/२००९ अन्वये सदरहु अधिसूचनेच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार धारावी क्षेत्रातील सेक्टर-५ चे नियोजन व विकास करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाची उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने समक्रमांकाचे दि. ७/०२/२०२३ रोजीचे अधिसूचनेन्वये सदरहू अधिसूचनेच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार धारावी क्षेत्रालगत असलेल्या रेल्वेच्या जमिनीचा धारावी अधिसूचित क्षेत्रात समावेश करुन सदर क्षेत्राचे नियोजन व विकास करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाची उक्त अधिनियमाच्या कलम ४०(१बी) अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्वसन प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्राधिकरण" असा करण्यात आलेला आहे.) यांनी दि.१६/०४/२०२५ रोजीचे शासन नगर विकास विभागास सादर केलेल्या पत्रात असे नमूद आहे की, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय दिनांक १०/०६/२०२४ अन्वये आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अखत्यारीतील प्लॉट नं. २ सर्व्हे नं. २२९, मौजे -कुर्ला भाग-3, मातृदुग्धशाळा, ता. कुर्ला येथील अंदाजे ८.५० हेक्टर जमीन (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमीन" असा करण्यात आलेला आहे.) धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास हस्तांतरित करण्याबाबत निर्णय झालेला आहे. तसेच महसूल व वन विभागाकडील दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये उक्त अंदाजे ८.५० हेक्टर जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पास काही अटी शर्तीवर कब्जेहक्काने प्रदान करण्यात आलेली आहे. यास अनुसरून नगर भूमापन अधिकारी, कुर्ला यांनी सिमांकन करून सदर अंदाजे ८.५० हेक्टर जमीनीचा ताबा दिनांक ०४/०२/२०२५ रोजी धारावी पुनर्विकास प्रकल्पास दिला असल्याचे नमूद केले असून, उक्त जमिनीसाठी "धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची" विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन नगर विकास विभागास विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाची विनंती व उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, त्याअनुषंगाने अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक असल्याची शासनाचे मत झाले आहे;

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई - 32.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ४०(१बी) अन्वये प्राप्त अधिकारात आणि त्या संदर्भातील सर्व शक्तीचा वापर करुन शासन याद्वारे :

अ) खालील परिशिष्टामध्ये विशेषत्वाने नमूद केलेले क्षेत्राचे नियोजन व विकास करण्यासाठी "धारावी पुनर्विकास प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण" ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करत आहे. तसेच,

ब) सदरची अधिसूचना शासकीय राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेचा दिनांक हा सदर अधिसूचना अंमलात आलेचा दिनांक असेल.

## परिशिष्ट

(I) मौजे कुर्ला भाग-३, ता. कुर्ला, सर्व्हे नं.२२९, न.भू.क्र. २ येथील ८.५० हेक्टर क्षेत्रापैकी अंदाजे क्षेत्र ५.९० हेक्टर (विभाग "अ") आणि त्याच्या लगतच्या सीमा :-

| Sr. No. | Directions | Bounded by |
|---|---|---|
| 1 | North | Harbour line railway track |
| 2 | North-East | Harbour Line railway track and Boundary of Metro Line -Phase 2B |
| 3 | East | Boundary of Metro Line Phase 2B |
| 4 | South-East | Boundary of Metro Line Phase 2B |
| 5 | South | Boundary of Suprit Dagade Apartment Building No. 133 |
| 6 | South-West | Boundary of Building: Gagan 139, Ragav Marvel, Building No. 141, 142, 143, Ragav One, Ragav 45 |
| 7 | West | Boundary of Building: Gagan 139, Ragav Marvel, Building No. 141, 142, 143, Ragav One, Ragav 45 |
| 8 | North-West | Railway Plot Boundary along Harbour line railway track |

(II) मोजे कुर्ला भाग-३, ता. कुर्ला, सर्व्हे नं. २२९. न.भू.क्र.२ येथील ८.५० हेक्टर क्षेत्रापैकी अंदाजे क्षेत्र २.६० हेक्टर (विभाग "ब" ) आणि त्याच्या लगतच्या सीमा:-

| Sr. No. | Directions | Bounded by |
|---|---|---|
| 1 | North | Harbour line railway track |
| 2 | North-East | Boundary of Nalla along kamgar Nagar Road |
| 3 | East | Boundary of Nalla along kamgar Nagar Road |
| 4 | South-East | Shree Krishna Mandir and Shree Vitthal Rukmini Mandir, Kamgar Nagar road. |
| 5 | South | Boundary of Building Hareshwar Pride & Shantaram Naik Clinic & Healthcare Center |
| 6 | South-West | Lokmanya Tilak Terminus Flyover |
| 7 | West | Lokmanya Tilak Terminus Flyover |
| 8 | North-West | Lokmanya Tilak Terminus Flyover |

सदर अधिसूचनेची प्रत व नकाशा निरिक्षणाकरीता पुढील एक महिन्याच्या कालावधीमध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध असेल :-

१) धारावी पुनर्वसन प्रकल्प झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्सा हटमेंट, ई-ब्लॉक, महापालिका मार्ग, मुंबई-०१

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा / नियम ) या वेबसाइटवर देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32. सत्यमेव जयते

Patil

( अमर पाटील )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन